जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक १९८ | बुधवार, ११ फेब्रुवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER




## एसटीच्या ताफ्यात राजमाता जिजाऊ बस सेवा

### मार्च २०२६ पासून अतिवर्दळीच्या मार्गांवर धावणार

**मुंबई, ता. १० :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताफ्यात लवकरच राजमाता जिजाऊ नावाची नवी अत्याधुनिक बस सेवा दाखल होणार आहे. शिवनेरी, शिवशाही, हिरकणी यांसारख्या लोकप्रिय सेवांनंतर आता राजमाता जिजाऊ यांच्या नावाने ही नवीन सेवा सुरू करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे परिवहन मंत्री व एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

प्रवाशांना अतिवर्दळीच्या मार्गांवर उभे राहून प्रवास करावा लागू नये आणि प्रवास अधिक आरामदायी, सुरक्षित व सन्मानजनक व्हावा, या उद्देशाने ही बस खरेदी करण्यात आली आहे. राजमाता जिजाऊ बसमध्ये ३ बाय २ आसन रचनेसह ५५ आसनक्षमता असणार आहे. सध्या एसटीच्या बहुतांश बसमध्ये सुमारे ४० आसन व्यवस्था असून, नव्या बसमुळे १५ अतिरिक्त प्रवाशांना बसून प्रवास करता येणार असल्याचे सरनाईक यांनी स्पष्ट केले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य संकल्पनेमागे राजमाता जिजाऊ साहेब यांची प्रेरणाशक्ती होती. त्या हिंदवी स्वराज्याच्या जननी म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या स्मरणार्थ या नव्या बस सेवेचे नाव राजमाता जिजाऊ ठेवण्यात आल्याचेही सरनाईक यांनी सांगितले. याआधी एसटीने शिवनेरी, शिवशाही, शिवाई, यशवंती आणि हिरकणी अशा ऐतिहासिक व प्रेरणादायी नावांनी बस सेवा सुरू केल्या आहेत.


ही नवी सेवा मार्च २०२६ पासून टप्प्याटप्प्याने राज्यातील विविध आगारांमध्ये दाखल होणार आहे. सुरुवातीला अतिवर्दळीचे व लांब पल्ल्याचे मार्ग प्राधान्याने निवडण्यात येणार असून, नव्या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीलाच दोन प्रमुख शहरांदरम्यान ही सेवा सुरू करण्याचा एसटी महामंडळाचा मानस आहे.

# युवराज काकडे की कृषिराज चौधरी

## हवेली पंचायत समितीच्या सभापतीपदी कोणाची लागणार वर्णी

**लोणी काळभोर, ता. १० :** जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांचा निकाल सोमवारी (ता. ९) जाहीर होताच हवेली तालुक्यातील राजकीय समीकरणे पुन्हा एकदा ढवळून निघाली आहेत. हवेली पंचायत समितीच्या १२ जागांपैकी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) सर्वाधिक ६ जागांवर विजयी झाली असून भाजपाला ४, शिवसेना शिंदे गटाला १ तर १ जागा अपक्ष उमेदवाराने पटकावली आहे. त्यामुळे बहुमताचा आकडा ७ असताना कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. परिणामी, सत्तास्थापनेचा खेळ आता अपक्ष सदस्याभोवती फिरणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या पार्श्वभूमीवर थेऊर पंचायत समिती गणातील विजयी उमेदवार युवराज काकडे आणि कोरेगाव मूळ गणातील कृषिराज चौधरी हे दोघेही सभापती पदासाठी प्रबळ दावेदार मानले जात आहेत. दोन्ही गटांकडून जोरदार हालचाली सुरू असून, पक्षांतर्गत चर्चा, संपर्क मोहिमा आणि





राजकीय डावपेचांना वेग आला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस सर्वाधिक जागा मिळवूनही बहुमतापासून एक पाऊल दूर असल्याने आता अपक्ष उमेदवार विद्या गायकवाड यांची भूमिका निर्णायक ठरणार आहे. लोणी काळभोर वडकी गणातून निवडून आलेल्या विद्या गायकवाड या थेट किंगमेकरच्या भूमिकेत आल्या असून, त्यांच्या एका निर्णयावर संपूर्ण सत्तास्थापना अवलंबून राहणार आहे.

भाजप आणि राष्ट्रवादी या दोन्ही प्रमुख पक्षांकडून अपक्ष सदस्याला आपल्या बाजूने वळवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा सुरू आहे. पडद्यामागील राजकीय भेटीगाठी, फोनाफोनी आणि रणनीती आखण्याचे सत्र रंगात आले असून हवेली तालुक्याचे राजकारण सध्या तापले आहे.

दरम्यान, युवराज काकडे यांनी विकासकामांचा अनुभव आणि स्थानिक जनाधार यावर भर देत आपली दावेदारी मजबूत केली आहे. तर कृषिराज चौधरी यांनी संघटनात्मक ताकद आणि कार्यकर्त्यांचा पाठिंबा दाखवत सभापतीपदावर दावा सांगितला आहे. त्यामुळे राष्ट्रवादीतही अंतर्गत स्पर्धा उफाळून येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

एकीकडे राष्ट्रवादी सत्ता कायम ठेवण्याच्या तयारीत आहे, तर दुसरीकडे भाजप ऑपरेशन पंचायत समितीच्या माध्यमातून खेळीमेळीने सत्ता खेचण्याच्या प्रयत्नात आहे. या सत्तासंघर्षात विद्या गायकवाड कोणाला साथ देणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले असून येत्या काही दिवसांत हवेली पंचायत समितीचा सत्ताकिल्ला कोणाच्या ताब्यात जाणार, हे चित्र स्पष्ट होणार आहे.

| विजयी उमेदवार (कंसात गण) |
|---|
| **राष्ट्रवादी** |
| १) मनोज ऊर्फ कृषीराज चौधरी (कोरेगाव मूळ) |
| २) कोमल कांबळे (उरुळी कांचन) |
| ३) युवराज काकडे (थेऊर) |
| ४) सुषमा मुरकुटे (आव्हाळवाडी) |
| ५) अमोल टेकाळे (कदमवाकवस्ती) |
| ६) युवराज वांजळे (खानापूर) |
| **भाजप** |
| १) मोनिका कंद (लोणी कंद) |
| २) राणी वाळके (पेरणे) |
| ३) कुशाल सातव (केसनंद) |
| ४) सुदर्शन चौधरी (सोरतापवाडी) |
| **शिवसेना शिंदे गट** |
| शुभांगी खिरीड (खेड शिवापूर) |
| **अपक्ष** |
| विद्या गायकवाड (लोणी काळभोर-वडकी) |

## हडपसरमधील ८५ वर्षीय वृद्धाची २२ कोटींची ऑनलाइन फसवणूक

**पुणे, ता. १० :** हडपसर परिसरात राहणाऱ्या ८५ वर्षीय निवृत्त व्यावसायिकाची तब्बल २२.०३ कोटी रुपयांची ऑनलाइन गुंतवणूक फसवणूक केल्याप्रकरणी पुणे सायबर पोलिसांनी चार जणांना अटक केली आहे. बनावट शेअर ट्रेडिंग वेबसाइट आणि मोबाईल ॲपच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकाला आमिष दाखवून ही फसवणूक करण्यात आल्याचे तपासात उघड झाले आहे.

या प्रकरणात ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ येथील मुनिलकुमार सुरेंद्र सिंग (५१), छत्रपती संभाजीनगर येथील आकाश चंद्रशेखर मराठे (२७), लाला केशव उमप (२६) आणि परमेश्वर दिलीप दाभाडे (२३) यांना अटक करण्यात आली आहे. सर्व आरोपींना सोमवारी पुणे न्यायालयात हजर करण्यात आले असता, त्यांना गुरुवारपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. सायबर पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपींनी बनावट ऑनलाइन गुंतवणूक प्लॅटफॉर्म तयार करून कमी वेळात मोठा नफा मिळेल, असे भासवले. सुरुवातीला अल्प रकमेवर परतावा देत पीडिताचा विश्वास संपादन करण्यात आला. त्यानंतर टप्प्याटप्प्याने मोठ्या रकमेची गुंतवणूक करण्यास भाग पाडून वृद्धाची फसवणूक करण्यात आली.

# अखेर भारत–पाकिस्तान सामना होणार

### टी-२० वर्ल्ड कपमध्ये १५ फेब्रुवारीला आमने सामने येणार

**पुणे, ता. १० :** भारत आणि पाकिस्तानमधील क्रिकेट युद्धावर मागील काही दिवसांपासून दाटलेले बहिष्काराचे ढग अखेर दूर झाले आहेत. आयसीसीने घेतलेली कठोर भूमिका आणि मित्रराष्ट्रांच्या विनंतीनंतर पाकिस्तान सरकारने नमते घेत आपल्या संघाला भारताविरुद्ध खेळण्यासाठी ग्रीन सिग्नल दिला आहे. यामुळे आता येत्या रविवारी, १५ फेब्रुवारी २०२६ रोजी कोलंबोच्या प्रेमदासा स्टेडियमवर क्रिकेट विश्वातील हा सर्वात मोठा सामना नियोजित वेळेनुसार पार पडणार आहे.

पाकिस्तान सरकारने अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, मैत्रीपूर्ण राष्ट्रांच्या विनंतीचा मान राखून आणि बहुपक्षीय चर्चेतून निघालेल्या सकारात्मक निष्कर्षानंतर, पाकिस्तान संघाला टी-२० विश्वचषकातील




भारताविरुद्धच्या सामन्यासाठी मैदानात उतरण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या घोषणेमुळे क्रिकेट चाहत्यांनी सुटकेचा नि:श्वास टाकला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आयसीसी प्रमुख जय शाह यांनी या प्रकरणात अत्यंत कठोर पवित्रा घेतला होता. पीसीबीने भारताविरुद्ध खेळण्यासाठी महसूल वाट्यात वाढ आणि द्विपक्षीय मालिका सुरू करण्याच्या अटी घातल्या होत्या, ज्या जय शाह यांनी स्पष्टपणे फेटाळून लावल्या. जर पाकिस्तानने बहिष्कार टाकला असता, तर त्यांच्यावर मोठा आर्थिक दंड आणि जागतिक क्रिकेट मधून एकाकी पडण्याची टांगती तलवार होती, ज्यामुळे अखेर पीसीबीला माघार घ्यावी लागली.

या संपूर्ण वादाची सुरुवात बांगलादेशने भारतात खेळण्यास नकार दिल्याने झाली होती. बीसीसीआयने मुस्ताफिझूर रहमानला आयपीएल मधून रिलीज करण्यास सांगितल्यामुळे बांगलादेश नाराज होता. मात्र, आता आयसीसी आणि बांगलादेशमध्ये करार झाला असून, २०३१ पूर्वी बांगलादेशला एका आयसीसी स्पर्धेचे यजमानपद दिले जाणार आहे. याच पार्श्वभूमीवर बीसीबीचे अध्यक्ष अमिनुल इस्लाम यांनी पाकिस्तानला भारताविरुद्ध खेळण्याचे आवाहन केले होते.

**मोहसिन नक्वींचे ते विधान चर्चेत**


विशेष म्हणजे, माघार घेण्यापूर्वी पीसीबी प्रमुख मोहसीन नक्वी यांनी अत्यंत आक्रमक पवित्रा घेतला होता. आम्ही कोणत्याही निर्बंधांना किंवा धमक्यांना घाबरत नाही, असे त्यांनी म्हटले होते. मात्र, जागतिक क्रिकेटमधून बहिष्कृत होण्याच्या भीतीने पाकिस्तानला अवघ्या ८ दिवसांतच निर्णय बदलावा लागला.

# वारजे येथील नवीन मुठा नदीवरील पुलाच्या कामाला वेग

### मुंबई-सातारा बाजूकडील सुमारे ८० टक्के काम पूर्ण

**पुणे, ता. १० :** पुणे शहराजवळील मुंबईबेंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील वारजे परिसरात मुठा नदीवर उभारण्यात येणारा नवीन पूल अंतिम टप्प्यात आला असून, पुढील तीन महिन्यांत हा पूल वाहतुकीसाठी खुला होण्याची शक्यता आहे. या पुलाचे मुंबईसातारा बाजूकडील सुमारे ८० टक्के काम पूर्ण झाले असून, उर्वरित कामे वेगाने सुरू आहेत.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, पुलाच्या एका बाजूला गर्डर बसवणे, डेक स्लॅब तसेच संरक्षक अडथळे उभारण्याचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. सातारा ते मुंबई बाजूकडील सर्व खांब उभे करण्यात आले असून, लवकरच बीम लाँचिंगचे काम सुरू होणार आहे. प्रकल्प ठरलेल्या वेळेत पूर्ण व्हावा यासाठी अतिरिक्त



कामगार आणि यंत्रसामग्री तैनात करण्यात आली आहे.

सध्या मुंबईसातारा कॅरेजवेचा मोठा भाग तयार झाला असून उर्वरित कामे अंतिम टप्प्यात आहेत. बांधकाम करताना सुरक्षितता आणि दर्जा यांना प्राधान्य दिले जात असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. हा पूल सुरू झाल्यानंतर सध्या अरुंद रस्ता आणि तात्पुरत्या वळणांमुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. नवीन पुलावर रुंद लेन आणि स्वतंत्र कॅरेजवे असणार असल्याने वाहनांची वाहतूक अधिक सोपी आणि सुरक्षित होईल.

दरम्यान, या पुलामुळे पुणे ते सातारा दरम्यानचा प्रवासाचा वेळ सुमारे २० ते ३० मिनिटांनी कमी होण्याची शक्यता असून, याचा फायदा दैनंदिन प्रवासी, एसटी व खासगी बससेवा तसेच मालवाहतूक करणाऱ्या वाहनांना होणार आहे. पुलाच्या उद्घाटनानंतर परिसरातील वाहतूक अधिक सुरळीत करण्यासाठी सेवा रस्ते, सिग्नल यंत्रणा, रस्त्यांवरील खुणा आणि दिशादर्शक फलक बसवण्याची योजना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने आखली असल्याचे सांगण्यात आले आहे.

## घरगुती वादातून भावजयच्या डोक्यात घातला दगड; दीर व जाऊबाईवर गुन्हा दाखल

**लोणी काळभोर, ता. १० :** घरातील कामाच्या कारणावरून झालेल्या वादातून भावजयच्या डोक्यात दगड मारून तिला गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील टाक्याचा मळा परिसरात शनिवारी (ता. ७) सायंकाळी पाचच्या सुम ारास घडली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून लोणी काळभोर पोलिसांनी दीर व जाऊबाईविरोधात गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

दिलीप मुकुंद शिंदे (वय ३०) व लक्ष्मी दिलीप शिंदे (वय २५, दोघे रा. टाक्याचा मळा, लोणी काळभोर, ता. हवेली, जि. पुणे) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी लक्ष्मी तात्याबा शिंदे (वय ३०, रा. टाक्याचा मळा) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात




फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी लक्ष्मी तात्याबा शिंदे या स्वयंपाक बनविण्याचे काम करतात. शनिवारी सायंकाळी नेहमीप्रमाणे त्या घरात काम करत असताना आरोपींनी घरातील काम ावरून त्यांना शिवीगाळ करत दमदाटी केली. यानंतर हाताने मारहाण करण्यात आली. वाद अधिक चिघळल्यानंतर आरोपी दिलीप शिंदे याने घराबाहेर जाऊन दगड आणला व तो थेट फिर्यादीच्या डोक्यात मारून त्यांना जखमी केले. या मारहाणीत फिर्यादी महिला जखमी झाल्या असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेनंतर त्यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार दोघांविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३) तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(२)(३) व १३५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार नळे करीत आहेत.

# हवेली तालुक्यातील ४९ ग्रामपंचायतीवर प्रशासकराज; निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत प्रशासकांकडे कारभार

**उरुळी कांचन, ता. १० :** हवेली तालुक्यातील लोणी काळभोर, उरुळी कांचनसह लहान-मोठ्या एकूण ४९ ग्राम पंचायतींवर मंगळवारपासून (ता. १०) प्रशासकराज लागू करण्यात आले आहे. फेब्रुवारी २०२६ अखेर संबंधित ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपल्याने लोकनियुक्त सरपंच व सदस्यांचा अधिकार मंगळवारपासून संपुष्टात आला असून पुढील निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत प्रशासकांकडे कारभार सोपवण्यात आला आहे.

संबंधित ग्रामपंचायतींचा कारभार आजपासून विस्तार अधिकारी दर्जाच्या प्रशासकांच्या हातात दिला जाणार आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वच पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी प्रशासकांच्या नियुक्त्या केल्या आहेत.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम १५१ (१) (क) तसेच सन २०२० च्या महाराष्ट्र अध्यादेश क्र. १० (दि. २५ जून २०२०) मधील तरतुदीनुसार, नैसर्गिक आपत्ती, महामारी किंवा प्रशासकीय अडचणींमुळे ग्रामपंचायत निवडणुका घेणे शक्य नसल्यास शासनास प्रशासक नियुक्तीचा अधिकार आहे. त्यानुसार शासन निर्णयाद्वारे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना प्रशासक नेमणुकीचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

या अधिकारांचा वापर करत पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पंचायत समिती हवेली अंतर्गत मुदत संपलेल्या ग्राम




पंचायतींसाठी प्रशासकांची नियुक्ती केली आहे. नियुक्त प्रशासकांनी तात्काळ पदभार स्वीकारून ग्राम पंचायतीचा दैनंदिन व प्रशासकीय कारभार सुरळीतपणे चालवण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत

नियुक्त प्रशासकांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ व महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा संहिता २०११ नुसार सरपंचाचे सर्व अधिकार व कर्तव्ये बजावावी लागणार आहेत. मात्र, विधीग्राह्य व नव्याने निवडून आलेली ग्रामपंचायत अस्तित्वात येताच प्रशासकपद आपोआप समाप्त होणार आहे.

कृषी, शिक्षण, पशुसंवर्धन विभागाचे विस्तार अधिकारी, पाणी पुरवठा उपअभियंता, तसेच अंगणवाडी पर्यवेक्षक अशा संवर्गातील अधिकाऱ्यांना प्रशासक म्हणून नियुक्त्या दिल्या आहेत. मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे वेध लागले आहेत. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकानंतरच ग्रामपंचायती जाहीर होण्याची शक्यता असल्याने किमान तीन महिने तरी ग्रामपंचायतींच्या इच्छुकांना वाट पहावी लागणार आहे.

दरम्यान, प्रशासकांकडून गैरवर्तणूक, कर्तव्यात कसूर किंवा कोणतीही लांच्छनास्पद बाब आढळून आल्यास संबंधित प्रशासकास तात्काळ पदावरून हटवण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना असतील, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

**गाव व कंसात नियुक्त प्रशासक**

- लोणी काळभोर, उरुळी कांचन, सोरतापवाडी, वडकी : जयश्री बाजीराव बेनके
- आळंदी म्हातोबाची, भवरापूर, कुंजीरवाडी, शिंदवणे : प्रीती गणेश जगदाळे
- हिंगणगाव, पेठ : शकुंतला परमेश्वर चाटे
- नायगाव, प्रयागधाम, तरडे, वळती : प्रमिला हरिभाऊ बोऱ्हाडे
- अष्टापूर : हर्षल गौतम रोकडे
- बिवरी : शंकर विष्णू मुंडे
- थेऊर : सुनील सीताराम रुपणर
- कोरेगाव मूळ : गजानन शंकर नारकर

## संक्षिप्त

### भाड्याने घेतलेला कॅमेरा परत न करता पावणेतीन लाखांची फसवणूक




**हिंजवडी, ता. १० :** व्यावसायिक कामासाठी भाड्याने घेतलेला महागडा कॅमेरा आणि इतर साहित्य मुदतीनंतर परत न करता स्वत:साठी वापरून फसवणूक केल्याची घटना घडली आहे. ही घटना १ते जानेवारी दरम्यान हिंजवडी येथे घडली. याबाबत २७ वर्षीय तरुणाने हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी एका विरोधात गुन्हा दाखल केला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने फिर्यादीचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडून महागडा कॅमेरा आणि इतर साहित्य असा एकूण २ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल भाड्याने घेतला होता. मात्र, भाड्याची मुदत संपल्यानंतरही त्याने साहित्य परत न करता फिर्यादीची फसवणूक केली. हिंजवडी पोलीस तपास करत आहेत.

### व्यावसायाचे आमिष दाखवून शेतकऱ्याला ६६ लाखांचा गंडा

**हिंजवडी, ता. १० :** इंपोर्ट-एक्सपोर्ट आणि रिअल इस्टेट व्यवसायातून मोठ्या फायद्याचे आमिष दाखवून एका शेतकऱ्याची लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. ही घटना सप्टेंबर २०२० पासून २ जुलै २०२२ या कालावधीत हिंजवडी, औंध आणि बाणेर परिसरात घडली. याप्रकरणी ४० वर्षीय व्यक्तीने हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी संगनमत करून फिर्यादीचा विश्वास संपादन केला. फिर्यादीकडे पैसे नसतानाही त्यांच्या जमिनीवर बँकेचे कर्ज काढण्यास लावले आणि ते पैसे स्वत:च्या फायद्यासाठी वापरले. कोणताही व्यवसाय न करता किंवा मूळ भांडवल परत न देता आरोपींनी फसवणूक केली आणि पैशांची मागणी केल्यावर फिर्यादीला धमकावले. हिंजवडी पोलीस तपास करत आहेत.

### तडीपार गुंडाला शस्त्रासह अटक




**बावधन, ता. १० :** शहरातून दोन वर्षांसाठी तडीपार केलेले असतानाही छुप्या पद्धतीने वास्तव्य करून दहशत माजवणाऱ्या एका गुंडाला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. ही कारवाई सोमवारी (९ फेब्रुवारी) रात्री बावधन येथील कोकाटे वस्ती येथे करण्यात आली. या प्रकरणात पोलीस शिपाई ऋषीकेश पाटील यांनी बावधन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी शंकर बाळासाहेब तोडकर (४३, कोकाटेवस्ती, बावधन) याला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीला पुणे जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आले होते. तरीही कोणतीही परवानगी न घेता तो परिसरात वावरत होता. त्याच्याकडे लोखंडी कोयता मिळून आला असून तो आरडाओरडा करून परिसरात दहशत निर्माण करत होता. बावधन पोलीस तपास करत आहेत.

### नातेवाईकाच्या लग्नासाठी दोन-तीन दिवसांकरिता घेतलेली मोटार परस्पर विकली

**पिंपरी, ता. १० :** नातेवाईकाच्या लग्नासाठी दोन-तीन दिवसांकरिता घेतलेली मोटार बनावट कागदपत्रे तयार करून परस्पर विकल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ही घटना २० सप्टेंबर २०२५ पासून ९ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत चिंचवड येथील वाल्हेकरवाडी परिसरात घडली. याप्रकरणी ऋषीकेश विठ्ठल महापुरे (२४, वाल्हेकरवाडी, चिंचवड) यांनी चिंचवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी भालचंद्र सुखदेव थोरात (३८, वाल्हेकरवाडी, चिंचवड) यांना अटक केली आहे. त्यांच्या तीन साथीदारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांची १२ लाख रुपये किमतीची अलिशान मोटार आरोपींनी लग्नाचे कारण सांगून नेली. त्यानंतर आरोपींनी संगनमत करून मोटारीचे बनावट आरसी बुक, आधारकार्ड आणि पॅनकार्ड बनवले. या कागदपत्रांच्या आधारे फिर्यादीची कोणतीही संमती न घेता मोटारीची परस्पर विक्री करून त्यांची आर्थिक फसवणूक केली. चिंचवड पोलीस तपास करत आहेत.

### शरद पवार रुग्णालयात, प्रकृती स्थिर

**पुणे, ता. १० :** राष्ट्रवादीचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांची प्रकृती बिघडल्याने सोमवारी त्यांना उपचारासाठी रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आले आहे. त्यांच्या छातीत कफ झाला आहे. त्यांच्या प्राथमिक वैद्यकीय तपासण्या करण्यात आल्या आहेत. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून चिंता करण्यासारखे काही नाही, अशी माहिती त्यांच्यावर उपचार करणारे डॉ. अभिजित लोढा यांनी दिली. पवार हे बारामती येथील त्यांच्या गोविंदबाग या निवासस्थानी होते. सोमवारी त्यांना घसा दुखणे, कफचा त्रास जणवत असल्याने श्वास घेण्यास काहीसा अडथळा निर्माण होत होता. त्यामुळे तत्काळ त्यांना पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले.

# अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत शंका : रोहित पवार

## अपघाती निधनाबद्दल उपस्थित केले मोठे प्रश्न

**मुंबई, ता. १० :** माजी उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजित पवार यांच्या २८ जानेवारी २०२६ रोजी बारामती येथे झालेल्या भीषण विमान अपघाताने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या अपघातात अजित पवारांसह विमानातील इतर चार जणांचाही मृत्यू झाला. अपघातानंतर विविध शंका, अफवा आणि चर्चा सुरू झाल्या होत्या. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी यापूर्वी प्रश्न उपस्थित केले होते, परंतु आता पवार कुटुंबाकडून प्रथमच या घटनेवर थेट आणि तांत्रिक प्रश्न विचारण्यात आले आहेत.

अजित पवारांचे पुतणे आणि आमदार रोहित पवार यांनी मंगळवारी (ता. १०) मुंबईत पत्रकार परिषद घेऊन या अपघाताबाबत गंभीर



शंका व्यक्त केल्या. त्यांनी स्थानिक लोकांच्या प्रतिक्रिया, उपलब्ध सीसीटीव्ही फुटेज आणि विमान कंपनीच्या दाव्यांवर आधारित विमान कंपनीचा दावा संशयास्पद वाटत असल्याचे सांगितले. यांत्रिक बिघाड झाला असावा, असे मत व्यक्त करत त्यांनी प्रकरणाच्या सखोल चौकशीची मागणी केली आहे.

**घड्याळाचा भावनिक आणि पुराव्याचा संदर्भ**

पत्रकार परिषदेत बोलताना रोहित पवार अत्यंत भावूक झाले. अजितदादा आता आपल्यात नसल्याचे सांगताना त्यांनी अजित पवारांच्या हातातील घड्याळाचा उल्लेख केला. अपघातानंतर सापडलेले ते जळालेल्या अवस्थेतील घड्याळ पाहूनच त्यांना खात्री पटली की, दादांचा खरोखर विमान अपघात झाला आणि ते आता आपल्याला सोडून गेले आहेत. हा केवळ अपघात नसून, त्यामागे तांत्रिक त्रुटी किंवा दुर्लक्ष असू शकते का, याची काटेकोर पडताळणी होणे आवश्यक असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, या पत्रकार परिषदेनंतर अपघाताच्या तपासाला नवीन वळण लागण्याची शक्यता आहे. विमान कंपनी, मेंटेनन्स रेकॉर्ड आणि संबंधित अधिकाऱ्यांकडून या ५ प्रश्नांची उत्तरे मिळणे अपेक्षित आहे. या घटनेने महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, सत्य समोर येण्याची प्रतीक्षा आहे.

### रोहित पवारांनी उपस्थित केलेले ५ प्रमुख तांत्रिक प्रश्न

१. विमानात नेमका काय बिघाड झाला होता? हे केवळ मेकॅनिकल फेल्युअर होते का, की त्यामागे इतर कारणे होती?

२. विमानाने उड्डाण करण्यापूर्वी त्याची रीतसर तपासणी केली होती का? ही तपासणी करणारे कर्मचारी नक्की कोण होते?

३. विमानाचा टेक-ऑफ लॉग आणि एअरवर्थिनेस रिपोर्ट सध्या कुठे आहे? तो रिपोर्ट सार्वजनिक करण्यात यावा.

४. विमानाची रुटीन लाइन मेंटेनन्स झाली होती का? ती कोणी केली होती? तसेच हॅन्गरमधील सीसीटीव्ही फुटेज कुठे आहे आणि ते उपलब्ध करून द्यावे.

५. विमानाचा हेवी बेस मेंटेनन्स झाला होता का? त्याचा अधिकृत रिपोर्ट काय सांगतो?

# शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांची पायरसी करणाऱ्यांनी पुस्तकाच्या पायरसीबाबत बोलू नये

## संजय राऊत यांनी खडसावले

**मुंबई, ता. १० :** मोदींच्या कार्यकाळात पायरसीचे अनेक प्रकार आहेत. त्यांच्या काळात प्रत्येक गोष्टीची पायरसी होत आहे. राजकीय पक्षांची पायरसी होते, तर एका पुस्तकाची काय बाब आहे? असा सावल करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेत, खासदार संजय राऊत यांनी भाजपला चांगलेच फटकारले आहे. माजी लष्करप्रमुख जनरल मनोज नरवणे यांचे पुस्तक प्रकाशित झाले नाही, तरी त्यातील माहिती उघड कशी झाली, याबाबत संजय राऊत यांनी हे वक्तव्य केले.



माजी लष्करप्रमुख जनरल मनोज नरवणे यांचे पुस्तक प्रकाशित झाले नाही, असे सांगण्यात येत आहे. मात्र, मोदींच्या कार्यकाळात पायरसीचे अनेक प्रकार आहेत. त्यांच्या काळात प्रत्येक गोष्टीची पायरसी होत आहे. राजकीय पक्षांची पायरसी होते, तर एका पुस्तकाची काय बाब आहे. उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांची पायरसी कोणी केली? मिंधे आणि अजित पवार यांचे गट ही मोदी आणि शहा यांनी केलेली पायरसीच आहे, त्यामुळे पायरसीवर बोलण्याचा त्यांना अधिकार नाही, त्यांनी त्यावर बोलू नये.

विधानसभा अध्यक्ष आणि विधानपरिषद सभापती यांचे अधिकार निश्चित करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीचे प्रमुखपद राहुल नार्वेकर यांच्याकडे देण्यात आल्याबाबत संजय राऊत म्हणाले, सत्यानाश, सबका विकास, सबका सत्यानाश, हेच यातून दिसून येत आहे. राहुल नार्वेकरांनी आपल्या अधिकारांचे उल्लंघन करत, सर्व मर्यादा ओलांडत शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीवर शिक्कामोर्तब केले, पक्षांतरबंदी कायदा पायदळी तुडवला, त्यांच्याकडे या समितीचे अध्यक्षपद देणे म्हणजे डाकू मानसिंगकडे देशाची कायदा सुव्यवस्था देण्यासारखे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

भाषेसाठी नाही लढायचे तर कशासाठी लढायचे. देशाच्या आणि राज्यांच्या निर्मितीत भाषेचे महत्त्वाचे योगदान आहे. देशाची अखंडता कायम ठेवण्यासाठी भाषावार प्रांतरचना करण्यात आली. हिंदी या देशातील प्रमुख भाषा आहे, मात्र, तिचे अतिक्रमण होता कामा नये, प्रत्येक भाषेची संस्कृती आणि तिचे महत्त्व जपणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रत्येची राज्याची भाषा ही राजभाषा आहे, अशी राष्ट्रीय स्वंयसेवक संघाची भूमिका आहे. त्यामुळे हिंदी सक्तीबाबत राज्याच्या भाषेबाबतच्या भूमिकेला संघाने विरोध करण्याचे कारण नाही, असे मतही संजय राऊत यांनी व्यक्त केले.



# पंतप्रधान मोदींचा शरद पवारांना फोन; तब्येतीची केली विचारपूस

**पुणे, ता. १० :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांना काल ९ फेब्रुवारी यांना बारामतीमधून पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आले. याबाबत सोशल मिडियावर पोस्ट शेअर करत सुप्रिया सुळे यांनी शरद पवारांचे सर्व रिपोर्ट्स नॉर्मल आहेत, त्यामुळे काळजी करण्याचे कारण नसल्याची माहिती दिली होती.

यानंतर आता पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शरद पवारांना फोन करत त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली आहे. याशिवाय केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही शरद पवार यांना फोन केल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, काल सुप्रिया सुळे यांनी पोस्टद्वारे सांगितले होते की, बाबांना छातीत संसर्ग झाला आहे. त्यांना ५ दिवसांच्या अँटीबायोटिक्सचा कोर्स करण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला. सुदैवाने, त्यांचे इतर सर्व रिपोर्ट्स सामान्य आहेत, त्यामुळे काळजी करण्याचे कारण नाही. तुमच्या शुभेच्छा आणि पाठिंब्याबद्दल सर्वांचे आभार. सर्व डॉक्टरांचे मनापासून आभार.

# लोणावळ्यात सनसेट पाहण्याचा मोह जीवावर बेतला

## पुण्यात स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या तरुणाचा दरीत कोसळून मृत्यू

**लोणावळा, ता. १० :** मेहकर येथील सेवानिवृत्त प्राध्यापक वसंत गिरी यांचा एकुलता एक मुलगा प्रज्वल वसंत गिरी (वय २६) याचा लोणावळा येथील खंडाळा टेकडीवर झालेल्या दुर्दैवी अपघातात मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. सनसेट पाहताना पाय घसरून तो सुमारे ७० ते ८० फुट खोल दरीत कोसळल्याने त्याच्या डोक्याला व हाताला गंभीर दुखापत झाली. त्यातच त्याचा मृत्यू झाला.

खोपोली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ८ फेब्रुवारी रोजी प्रज्वल गिरी हा आपल्या नातेवाईकांसह लोणावळा येथे आला होता. लोणावळ्यातील एका हॉटेल मध्ये त्यांचा मुक्काम होता. हॉटेलमध्ये



प्रवेश करण्यासाठी थोडा वेळ लागत असल्याने त्याने सायंकाळी सहा ते साडेसहाच्या सुमारास सनसेट पॉईंट बघण्याचा निर्णय घेतला. हॉटेलमधून बाहेर पडून सर्वजण खंडाळा टेकडीवर सनसेट पाहण्यासाठी गेले होते.

सनसेट पाहत असताना अचानक प्रज्वलचा पाय घसरला आणि तो खोल ७० ते ८० फुट दरीत कोसळला. या अपघातात त्याला डोक्याला व हाताला गंभीर दुखापत झाली. त्यातच त्याचा मृत्यू झाला. डोंबिवली येथील नातेवाईक मंगेश रामकृष्ण गोसावी यांनी खोपोली पोलीस स्टेशनला घटनेची खबर दिली. त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन सर्व प्राथमिक सोपस्कार पूर्ण केले. पुढील तपासासाठी हा मर्ग लोणावळा शहर पोलीस स्टेशनकडे वर्ग करण्यात आला आहे.

प्रज्वल वसंत गिरी हा मेहकर येथील सर्वपरिचित सेवानिवृत्त प्राध्यापक वसंत गिरी यांचा एकुलता एक मुलगा होता. तो एमपीएससी तसेच नेट-सेट परीक्षेच्या तयारीसाठी पुणे येथे वास्तव्यास होता. त्याच्या अकाली निधनामुळे मेहकर शहरासह संपूर्ण परिसरात तीव्र हळहळ व्यक्त होत असून, गिरी कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

# अजितदादांच्या निधनानंतर पहिल्याच कॅबिनेटमध्ये मुख्यमंत्र्यांचा मोठा निर्णय

**मुंबई, ता. १० :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली १० फेब्रुवारी रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. ही बैठक उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतरची पहिलीच मंत्रिमंडळ बैठक असल्याने सुरुवातीला त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. राज्याचे मुख्य सचिव यांनी शोकप्रस्ताव वाचून दाखवला, तर मुख्यमंत्री फडणवीस यांनी नव्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची मंत्रिमंडळाशी औपचारिक ओळख करून देत त्यांचे स्वागत केले. बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह सर्व मंत्री उपस्थित होते.



या बैठकीत अजित पवार यांनी निधनापूर्वी पाठपुरावा केलेल्या काही महत्त्वाच्या विकास निर्णयांना मंजुरी देण्यात आली. त्यानुसार बारामती येथील क्रीडा संकुलाच्या विकासासाठी ७५ कोटी रुपये मंजूर करण्यात आले. तसेच औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी वालचंदनगररत्नापूर परिसरात एमआयडीसीसाठी १००० एकर जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. या प्रकल्पामुळे संबंधित भागात रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. प्रशासनिक कामकाज अधिक कार्यक्षम करण्यासाठी राज्यात ११ अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यालाही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. बैठकीत महसूल प्रशासनाशी संबंधित आणखी एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम २३० मध्ये सुधारणा करून पक्षकारांना इलेक्ट्रॉनिक मेलद्वारे नोटीस बजावण्याची प्रक्रिया कायदेशीर करण्यात आली आहे. या निर्णयामुळे जमीनविषयक प्रकरणांमध्ये नोटीस पोहोचवण्याची प्रक्रिया जलद होणार असून महसूल न्यायालयांतील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. एकूणच, या बैठकीत विकास प्रकल्पांना गती देणे, प्रशासन अधिक सक्षम करणे आणि डिजिटल प्रक्रियांना कायदेशीर मान्यता देणे अशा तीन महत्त्वाच्या दिशांमध्ये राज्य सरकारने पावले उचलल्याचे स्पष्ट झाले आहे.

# आकुर्डीतील म्हाळसाकांत चौकात ट्रॅक्टर ट्रॉली उलटून कारचा अपघात

**पिंपरी-चिंचवड, ता. १० :** पिंपरी-चिंचवड शहरात मंगळवारी दुपारी आकुर्डी रेल्वे स्थानकाच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर भीषण अपघात झाला. म्हाळसाकांत चौकाजवळ भरधाव वेगात वळण घेत असताना बांधकामाच्या ढिगाऱ्याने भरलेली ट्रॅक्टर ट्रॉली थेट एका होंडा अमेझ कारवर उलटली. या अपघातात कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून कारचालक जखमी झाला आहे.

हा अपघात एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडला. अपघातानंतर या मार्गावर मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. घटनास्थळी जमलेल्या नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण पसरले होते. अपघाताचे फोटो व व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहेत.




प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, ट्रॅक्टर चालक म्हाळसाकांत चौकात वेगात वळण घेत असताना वाहनावरील नियंत्रण सुटले. यामुळे ट्रॉली उलटून त्यातील बांधकामाचा कचरा रस्त्याने जात असलेल्या होंडा अमेझ कारवर कोसळला. परिणामी कारचा पुढील भाग पूर्णपणे चिरडला गेला.

कर्नाटक राज्यात नोंदणीकृत असलेल्या ट्रॅक्टरचा चालक या अपघातात सुखरूप बचावला असून त्याला कोणतीही दुखापत झाली नाही. मात्र कारचा चालक जखमी झाला असून त्याला तातडीने उपचारासाठी नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. या अपघातात कारचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.


अपघाताची माहिती मिळताच पोलीस आणि आपत्कालीन मदत पथक घटनास्थळी दाखल झाले. रस्त्यावर पडलेला बांधकामाचा ढिगारा हटवण्याचे काम सुरू करण्यात आले. बराच वेळ हा रस्ता वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला होता, त्यामुळे वाहनचालकांना पर्यायी मार्गांचा अवलंब करावा लागला.

एमआयडीसी भोसरी पोलीस अपघाताच्या कारणांची चौकशी करत असून ट्रॅक्टर चालकाविरुद्ध आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. जड वाहन चालकांनी वेग मर्यादा पाळावी आणि वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळावेत, असे आवाहनही पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# दादांची जागा कोणीच घेऊ शकत नाही : सुनेत्रा पवार; पदभार स्विकारल्यानंतर पहिली प्रतिक्रिया

**पुणे, ता. १० :** अजित पवार यांच्या निधानानंतर राज्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडल्या. त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. त्यांच्याकडे अर्थ खाते वगळता इतर तीन महत्वाची खात्यांची जबाबदारी सोपविण्यात आली. त्यानंतर त्या उपमुख्यमंत्री पदाचा पदभार कधी स्विकारणार याविषयी बोलले जात होते. अखेर ८ दिवसांनी मंत्रालयात जात सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाचा पदभार स्विकारला. त्यानंतर त्यांनी आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे.

दादांची जागा कोणीच घेऊ शकत नाही; पण त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा आणि



अधिक सक्षम महाराष्ट्र घडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी नक्की करेन. अशी पहिली प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी पदभार स्विकारल्यानंतर दिली. तसेच आज राज्य मंत्रिमंडळाची दुपारी १२ वाजता बैठक होणार आहे. अजित पवार यांच्या निधनामुळे मंत्रीमंडळाच्या बैठकीत अजित पवारांच्या जागी आता सुनेत्रा पवार या दिसणार आहेत. या बैठकीला त्या हजर राहण्याची शक्यता आहे.

राज्याच्या उपमुख्यमंत्री पदाचा पदभार स्विकारल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी एक्सवरून पोस्ट शेअर करत आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे. आज महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारत असताना विश्वासाची, कर्तव्याची आणि त्यागाची जाणीव सुद्धा आहे. मा. अजितदादांनी आयुष्यभर महाराष्ट्राच्या जनतेसाठी झटत विकासाचा जो ध्यास घेतला, तोच माझ्यासाठी मार्गदर्शक दीपस्तंभ आहे, अशी भावना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केली. पोस्टमध्ये त्या पुढे असेही म्हणाल्या आहेत की, दादांची कार्यशैली, निर्णयक्षमता आणि लोकांशी असलेले आत्मीय नाते, हेच बळ घेऊन मी पुढील वाटचाल करणार आहे. त्यांच्या अपूर्ण स्वप्नांना पूर्णत्व देणे, शेतकरी, महिला, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या अपेक्षांना न्याय देणे, हीच माझी प्राथमिकता असेल, असा शब्द त्यांनी महाराष्ट्रवासियांना दिला आहे.

दरम्यान, या कठीण प्रसंगी जनतेने दिलेले प्रेम, आधार आणि विश्वास हेच माझे सामर्थ्य आहे. त्यांच्या स्मृतीपुढे आज मी एकच वचन देते की, महाराष्ट्राच्या हितासाठी निष्ठेने आणि समर्पणाने कार्य करत राहीन, असेही सुनेत्रा पवार यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.

# निकालाने डोळ्यांत पाणी, पण जिद्द कायम; निर्मला नवलेंची पोस्ट व्हायरल

**पुणे, ता. १० :** शिरूर तालुक्यातील कारेगाव गणात झालेल्या पंचायत समिती निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी निर्मला नवले यांचा अनपेक्षित पराभव झाल्याने राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार मनीषा पाचंगे यांनी नवले यांचा पराभव करत या मतदारसंघात विजय मिळवला. सोशल मीडियावर मोठी लोकप्रियता असतानाही प्रत्यक्ष निवडणुकीत मतदारांनी वेगळा कौल दिल्याचे या निकालातून स्पष्ट झाले.



निर्मला नवले या तरुणांमध्ये लोकप्रिय चेहरा म्हणून ओळखल्या जातात. सोशल मीडियावर त्यांचे लाखो फॉलोअर्स असून विविध सामाजिक उपक्रमांमुळे त्यांनी स्वतः ची वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांचा प्रभाव लक्षात घेऊन राष्ट्रवादी काँग्रेसने त्यांना युवती कार्याध्यक्षपदाची जबाबदारी दिली होती. राज्यभरातील महिला आणि युवती संघटन मजबूत करण्यासाठी त्यांनी अनेक भागांत दौरे केले होते. कारेगाव ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाचा अनुभव असल्याने पंचायत समिती निवडणुकीत त्यांचा विजय निश्चित मानला जात होता, मात्र प्रत्यक्ष निकालात त्यांना पराभवाचा सामना करावा लागला.

राजकीय विश्लेषकांच्या मते, सोशल मीडियावरील लोकप्रियता आणि प्रत्यक्ष मतदारसंघातील संघटनात्मक ताकद यामध्ये फरक असतो. स्थानिक पातळीवरील सम ीकरणे, कार्यकर्त्यांची पकड आणि स्थानिक प्रश्नांवरील भूमिका या घटकांचा निकालावर मोठा परिणाम होतो. कारेगाव गणातील निकालाने हे वास्तव पुन्हा अधोरेखित केले आहे.

पराभवानंतर निर्मला नवले यांनी सोशल मीडियावर भावनिक प्रतिक्रिया व्यक्त करत कार्यकर्त्यांचे आभार मानले. गेल्या दोन महिन्यांत कार्यकर्त्यांनी घेतलेल्या मेहनतीबद्दल कृतज्ञता व्यक्त करत ही लढाई इथेच थांबणार नसून पुढील काळात नव्या जोमाने काम सुरू ठेवणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या या पराभवानंतर शिरूर तालुक्यातील स्थानिक राजकारणात नवी समीकरणे तयार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# दौंड पंचायत समितीवर आमदार राहुल कुल यांचे वर्चस्व

## भाजपाचे ८ तर राष्ट्रवादी काँग्रेसचे ६ उमेदवार विजयी

**राहुलकुमार अवचट**

यवत, ता. १० : तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या दृष्टीने महत्त्वाच्या दौंड पंचायत समितीच्या १४ जागांसाठी शनिवारी (दि. ७) रोजी मोठ्या उत्साहात मतदान पार पडले होते. सोमवारी (ता. ०९) रोजी मतमोजणी झाली यावेळी लोकशाहीत मतदारांनी आपली ताकद दाखवत दौंड तालुक्यातील समिश्र प्रतिसाद देत तालुक्यातील पुणे जिल्हा परिषदेच्या ७ जागांपैकी पैकी ६ जागांवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना विजयी केले तर भाजपाला केवळ एका जागेवर सम ाधान मानावे लागले. परंतु पंचायत समितीच्या १४ जागांपैकी भाजपाचे ८ उमेदवार विजयी झाल्याने पंचायत समितीसाठी जनतेने भाजपला पसंती दिली असल्याचे दिसून येत आहे.



दौंड तालुक्यातील राहू , खाम गाव , गोपाळवाडी, देऊळगाव राजे, कुरकुंभ, बोरीपार्धी, यवत , बोरीभडक या ८ गणात भाजपाचे उमेदवार विजयी झाले तर वरवंड , पारगाव, कानगाव , खडकी, पाटस, केडगाव या ६ गटात राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार विजयी झाले आहेत.

यापूर्वी झालेल्या पंचायत समितीच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचा ११ जागेवर विजय झाला होता तर भाजपाला केवळ राहू गणातील १ जागा आपल्याकडे ठेवण्यात यश मिळाले होते. यावेळी मात्र आमदार राहुल कुल यांच्या नेतृत्वात भाजपाने माजी आमदार रमेश थोरात यांना धक्का देत ८ जागांवर विजय संपादित करत तालुक्यात राहुल कुल यांचे वर्चस्व असल्याचे पंचायत समिती निवडणूकीत सिद्ध केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसला ६ जागांवर समाधान मानावे लागले. गेल्या अनेक वर्षापासून राष्ट्रवादी काँग्रेसकडे असलेली दौंड पंचायत समितीवर भाजपाने आपला झेंडा फडकवला आहे.

दौंड पंचायत समितीच्या झालेल्या १४ जागांसाठी राहू गणातून शुभांगी किसन शिंदे, खामगाव गणातून सुखदेव चोरमले, गोपाळवाडी गणातून सुमन सुरेश निकाळजे, देऊळगाव राजे गणातून अमृता अभिमन्यु गिरमकर, कुरकुंभ गणातून राहुल हनुमंत भोसले, बोरीपार्धी गणातून रेखा पोपट चौधरी, यवत गणातून तेजस्विनी दत्ता पडळकर, बोरीभडक गणातून राजश्री सागर म्हस्के हे भाजपाचे उमेदवार विजयी झाले तर पारगाव गणातून मनिषा संतोष ताकवणे, वरवंड गणातून प्रदीप किसन दिवेकर, कानगाव गणातून बाळासाहेब कुशाबा निवंगुणे, खडकी गणातून संजय संपत भोसले, पाटस गणातून शिवाजी संपतराव ढमाले, केडगाव गणातून धनंजय शहाजी शेळके हे राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार विजयी झाले आहेत.

# दहावी-बारावीच्या परीक्षांसाठी पीएमपीएम-एलकडून विशेष बस सुविधा जाहीर

**पुणे, ता. १० :** पुणे शहरात १० फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या बारावी आणि २० फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या दहावी परीक्षांच्या पार्श्वभूमीवर पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडने विद्यार्थ्यांसाठी विशेष बस सुविधा जाहीर केली आहे. परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांना सुरक्षित, सुरळीत आणि तणावमुक्त प्रवास करता यावा, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे.




पीएमपीएमएलकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, ज्या विद्यार्थ्यांकडे वैध बस पास आहे, त्यांना परीक्षेच्या कालावधीत स्वतंत्र तिकीट न काढता घरापासून थेट परीक्षा केंद्रापर्यंत प्रवास करता येणार आहे. त्यामुळे शेवटच्या क्षणी येणाऱ्या अडचणी टळण्यास मदत होणार असून विद्यार्थी वेळेवर परीक्षा केंद्रावर पोहोचू शकणार आहेत.

विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी पीएमपीएमएलने आणखी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. एसएससी आणि एचएससी परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना बसच्या पुढील प्रवेशद्वारातून चढण्याची मुभा देण्यात येणार आहे. यामुळे गर्दीच्या वेळेतही विद्यार्थ्यांना प्राधान्य मिळणार असून वेळेची बचत होणार आहे.

परीक्षा कालावधीत शहरातील प्रमुख बस थांब्यांवर पीएमपीएमएलचे अधिकारी व पर्यवेक्षक कर्मचारी तैनात राहणार आहेत. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, गर्दी नियंत्रणात ठेवणे आणि आवश्यक मदत पुरवणे, ही त्यांची प्रमुख जबाबदारी असेल.

दरम्यान, एखाद्या शाळेतील मोठ्या संख्येने विद्यार्थी विशिष्ट म ार्गावरून प्रवास करणार असल्याची पूर्वकल्पना दिल्यास, त्या मार्गावर अतिरिक्त बसेस सोडण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले आहे.

पीएमपीएमएल प्रशासनाने विद्यार्थी व पालकांनी या सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. या उपक्रमामुळे प्रवासाचा ताण कमी होऊन विद्यार्थी अभ्यासावर अधिक लक्ष केंद्रित करू शकतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनीही या निर्णयाचे स्वागत केले असून परीक्षेच्या काळात ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरेल, असे मत व्यक्त केले आहे.

# नगर जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना विहिरींच्या दुरुस्तीसाठी ६३ लाखांचा निधी

**अहिल्यानगर, ता. १० :** अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे २०२५ -२६ च्या खरीप हंगामात झालेल्या मुसळधार पावसाने मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणच्या शेत विहिरी गाळाने पूर्णपणे भरून गेल्या, तर काही विहिरी खचल्याने वापरासाठी अयोग्य ठरल्या. त्यामुळे रब्बी हंगामात सिंचनाची गंभीर समस्या निर्माण झाली होती.



या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने महत्त्वाचा निर्णय घेत जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांना दिलासा देणारा निधी मंजूर केला आहे. जिल्ह्यातील एकूण ४३७ नुकसानग्रस्त शेत विहिरींच्या दुरुस्तीसाठी ६३ लाख १० हजार ६८३ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या मदतीमुळे शेतकऱ्यांना विहिरींची दुरुस्ती करून शेतीसाठी पुन्हा पाण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. दीर्घकाळ प्रतीक्षेत असलेली ही मदत मिळाल्याने शेतकरी वर्गात समाधान व्यक्त होत आहे.

या आर्थिक मदतीच्या वितरणाचा प्रारंभ गुरुवारी पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सहा शेतकऱ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात धनादेश देण्यात आले. कार्यक्रमाला प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. उर्वरित पात्र शेतकऱ्यांना १५ फेब्रुवारीपर्यंत निधीचे वाटप पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कार्यालयाने संबंधित यंत्रणांना दिले आहेत.

खरीप हंगामातील जोरदार पावसामुळे जिल्ह्यातील अनेक भागांत पाणी साचून राहिले होते. याचा थेट परिणाम विहिरींवर झाला. काही विहिरींमध्ये मोठ्या प्रमाणावर गाळ साचला, तर काही ठिकाणी विहिरींचे बांधकाम खचल्याने त्या धोकादायक बनल्या. परिणामी रब्बी हंगामात पिकांना पाणी देणे अवघड झाले होते आणि अनेक शेतकऱ्यांना पाणी टँकरवर अवलंबून राहावे लागले होते.

या स्थितीचा आढावा घेत राज्य शासनाच्या नियोजन विभागाने १३ ऑक्टोबर २०२५ रोजी शासन निर्णय जारी केला. या निर्णयानुसार अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेत विहिरींच्या दुरुस्तीसाठी विशेष आर्थिक मदत देण्याचे ठरवण्यात आले आहे. प्रत्यक्ष दुरुस्तीवर झालेला खर्च किंवा कमाल ३० हजार रुपये, यापैकी कमी असलेली रक्कम मदत म्हणून देण्यात येणार आहे. याच निकषांनुसार जिल्ह्यातील शेतकऱ्यांना निधी मंजूर करण्यात आला आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

पुणे प्राइम न्यूज

http://www.puneprimenews.com

प्राईम लाईफ



## उन्हाळ्यात आवळा का खायला हवा, जाणून घ्या

आवळ्याला सुपरफुड म्हणून ओळखले जाते. आवळा खाण्याचे खूप फायदे असल्याने, आवळ्याचा समावेश आपल्या दैनंदिन जीवनात करणे खूप गरजेचे झालेले आहे. आवळ्यामुळे केसांचे आणि त्वचेचे आरोग्य सुधारण्यास खूप मोठ्या प्रमाणात मदत होते. आवळा कशा आणि कोणत्या पद्धतीने खायला हवा हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

रोज सकाळी रिकाम्या पोटी आवळ्याचा रस पिणे आरोग्यासाठी चांगले असते. ते लहान तुकडे करून किंवा थोडे मीठ घालून खाऊ शकता. वाळलेला आवळा गरम पाण्यात भिजवून किंवा चहामध्ये मिसळून खाऊ शकतो. तुम्ही आवळा पावडर मध किंवा कोमट पाण्यात मिसळून पिऊ शकता, यामुळे पचन आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते. याशिवाय आवळ्याचा मुरंबा हा देखील एक उत्तम पर्याय आहे.

तुम्हाला कच्चा आवळा खायला आवडत नसेल किंवा तो सहज उपलब्ध नसेल तर सुका आवळा किंवा आवळा पावडर देखील एक उत्तम पर्याय असू शकतो. तुम्ही ते बराच काळ साठवू शकता. याचे सेवन केल्याने पचनसंस्था मजबूत राहते, ज्यामुळे आम्लपित्त, अपचन आणि गॅसची समस्या दूर होते. तसेच, जर तुम्ही सुका आवळा किंवा आवळा पावडर खाल्ल्यास घसा खवखवणे आणि सर्दी यापासून आराम मिळतो. वाळलेल्या आवळ्यामध्ये असलेले कॅल्शियम हाडे मजबूत करते आणि सांधेदुखी कमी करते. आवळा पावडर चयापचय गतिमान करते आणि चरबी जाळण्याच्या प्रक्रियेला चालना देते, ज्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते.

उन्हाळ्यात आवळा खाण्याचे सर्वोत्तम फायदे : आवळा हा व्हिटॅमिन सीच्या सर्वोत्तम नैसर्गिक स्रोतांपैकी एक आहे. हे पोषक तत्व रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत करते, संसर्गाविरुद्ध शरीराचे संरक्षण मजबूत करते आणि आजारातून जलद बरे होण्यास मदत करते. ते एक शक्तिशाली अँटिऑक्सिडंट म्हणून देखील कार्य करते, मुक्त रॅडिकल्समुळे होणाऱ्या नुकसानापासून पेशींचे संरक्षण करते.

आवळ्यामध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते, जे पचनास मदत करते आणि बद्धकोष्ठता प्रतिबंधित करते. फायबरचे प्रमाण आतड्यांच्या हालचाली नियंत्रित करण्यास देखील मदत करते आणि निरोगी आतड्यांचे मायक्रोबायोम वाढवते, ज्यामुळे गॅस्ट्रिटिस आणि अपचन सारख्या पाचन विकारांचा धोका कमी होतो.

आवळ्याची खरी चव आणि अधिक पौष्टिकता हवी असेल तर कच्चा आवळा हा सर्वोत्तम पर्याय आहे. तुम्हाला अधिक काळ आवळ्याचे सेवन करायचे असल्यास, सुका आवळा किंवा आवळा पावडर वापरणे अधिक उत्तम. त्याचवेळी तुम्हाला सर्दी-खोकला, पचनाच्या समस्या किंवा वजन कमी करण्यात मदत हवी असेल तर आवळा पावडर अधिक फायदेशीर ठरू शकते.

# पुणे थेट युरोप आशियाशी जोडणार; पुरंदर विमानतळासाठी ६ हजार कोटी

**पुणे, ता. १० :** पुणे जिल्ह्यातील वाढती लोकसंख्या, झपाट्याने विस्तारत असलेले आयटी व औद्योगिक क्षेत्र आणि वाढती हवाई प्रवासी संख्या लक्षात घेता पुरंदर येथे प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाला राज्य मंत्रिमंडळाची अधिकृत मंजुरी मिळाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर ही घोषणा करत १ जून २०२६ पर्यंत जमीन अधिग्रहण प्रक्रिया पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश प्रशासनाला दिले आहेत. पुणे व पश्चिम महाराष्ट्राच्या दीर्घकालीन विकासासाठी हा प्रकल्प मैलाचा दगड ठरणार असल्याचे मानले जात आहे.



सध्या पुणे विमानतळावर प्रवासी व मालवाहतुकीचा प्रचंड ताण असून भविष्यातील वाढत्या गरजांसाठी नव्या आंतरराष्ट्रीय विमानतळाची आवश्यकता अनेक वर्षांपासून व्यक्त केली जात होती. पुरंदर विमानतळ कार्यान्वित झाल्यास पुणे, सातारा, सोलापूर, अहमदनगर व कोल्हापूर या भागांना थेट आंतरराष्ट्रीय हवाई सुविधा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे उद्योग, आयटी, पर्यटन तसेच कृषी निर्यात क्षेत्राला मोठी चालना मिळण्याची शक्यता आहे.

केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले की, गुंतवणूक व औद्योगिक वाढीसाठी एअर कनेक्टिव्हिटी अत्यंत महत्त्वाची असते. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळानंतर पश्चिम महाराष्ट्रासाठी पुरंदर विमानतळ हा दुसरा मोठा पर्याय ठरणार असून मध्य पूर्व, युरोप आणि दक्षिण-पूर्व आशिया या महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय मार्गांशी थेट संपर्क प्रस्थापित होणार आहे. यामुळे निर्यातवाढ, परकीय गुंतवणूक आणि जागतिक व्यवसाय संधी उपलब्ध होतील.

या प्रकल्पामुळे लॉजिस्टिक्स, वेअरहाऊसिंग, एमएसएमई उद्योग तसेच कृषी उत्पादनांच्या जलद वाहतुकीला गती मिळणार आहे. विशेषतः फळे, भाजीपाला व प्रक्रिया केलेल्या कृषी उत्पादनांच्या निर्यातीसाठी शेतकऱ्यांना मोठी बाजारपेठ खुली होण्याची शक्यता आहे. विमानतळ उभारणीमुळे हजारो थेट व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील, तसेच परिसरातील रस्ते, पाणी, वीज व इतर पायाभूत सुविधांच्या विकासालाही वेग येणार आहे. राज्य व केंद्र सरकारच्या समन्वयातून हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

## पुण्यात १५ वर्षीय मुलीने बाळाला जन्म दिला

**पुणे, ता. १० :** अवघ्या १५ वर्षांच्या अल्पवयीन मुलीने घरातच मुलाला जन्म देऊन स्वतःच बाळाची नाळ कापल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. सध्या संबंधित मुलगी व तिच्या नवजात बाळावर रुग्णालयात उपचार सुरू असून, याप्रकरणी समर्थ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आदिल फारुख शेख याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी मुलीच्या मोठ्या बहिणीने फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला मुलीची बहीण असून, ३१ जानेवारीला सकाळी माहेरी आईकडे आल्या होत्या, मात्र त्यावेळी घराचा दरवाजा आतून बंद असल्याचे दिसून आले. थोड्या वेळाने त्यांचा भाऊ आल्यानंतर आवाज दिल्यावर लहान बहिणीने दरवाजा उघडला. घरात प्रवेश करताच घरातील दरवाजाजवळ रक्ताचे डाग पडलेले दिसून आले. खिडकीजवळ एक नवजात बाळ ठेवलेले दिसल्याने तक्रारदार महिलेला धक्का बसला. लहान बहिणीला विश्वासात घेऊन विचारणा केली असता, तिने घरातच डिलिव्हरी झाल्याचे सांगितले.

# लोणी काळभोर येथे गुलाबपुष्पांनी बारावीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत

**लोणी काळभोर, ता. १० :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावीच्या लेखी परीक्षेला मंगळवारी (ता. १०) सुरुवात झाली. या पार्श्वभूमीवर लोणी काळभोर (ता. हवेली) येथील पृथ्वीराज कपूर मेमोरिअल हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन मनःपूर्वक स्वागत करण्यात आले. त्यामुळे परीक्षा केंद्र परिसरात सकारात्मक आणि उत्साही वातावरण निर्माण झाले होते.




लोणी काळभोर येथील केंद्रावर प्राचार्य सीताराम गवळी यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करत त्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. बारावी ही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील अत्यंत महत्त्वाची पायरी आहे. आत्मविश्वास, शांत मनःस्थिती आणि नियोजनबद्ध अभ्यासाच्या जोरावर प्रत्येक विद्यार्थ्याने यश मिळवावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी परीक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

याप्रसंगी केंद्र संचालक प्रा. सदानंद साळुंके, सहाय्यक केंद्र संचालक प्रा. अर्जुन कचरे, प्रा. संतोष वडर, शशिकांत शेंडगे, प्रा. जगदीप तिकोणे, प्रा. जितेंद्र साळुंखे, हवेली तालुका माध्यमिक शिक्षण संघटनेचे सचिव भाऊसाहेब महाडिक यांच्यासह शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पहिलाच पेपर असल्याने विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साह दिसून येत होता. या परीक्षा केंद्रात पृथ्वीराज कपूर मेमोरिअल हायस्कूलचे ४९१, चिंतामणी विद्यालय थेऊरचे ४४, एमआयटीचे २७०, एंजेल हायस्कूलचे ११०, फुरसुंगी येथील लिटल फ्लॉवर ज्युनिअर कॉलेजचे ५६ तसेच वडकी येथील मोडक इंटरनॅशनल ज्युनिअर कॉलेजचे १५ असे एकूण ९८६ विद्यार्थी परीक्षेसाठी उपस्थित होते. मात्र ८ विद्यार्थी गैरहजर राहिल्याची माहिती सहाय्यक केंद्र संचालक अर्जुन कचरे यांनी दिली. दरम्यान, परीक्षेदरम्यान कोणतेही गैरप्रकार घडू नयेत यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समिती कार्यरत करण्यात आली असून भरारी पथके, मंडळ सदस्य व शासकीय अधिकाऱ्यांच्या आकस्मिक भेटींचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच लोणी काळभोर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली परिसरात चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## मद्यपान करुन मोटार चालवू नको म्हटल्याने मित्रावर बिअरच्या बाटलीने हल्ला

**चाकण, ता. १० :** मद्याच्या नशेत वाहन चालवण्यास मज्जाव केल्याने एका तरुणाने मित्रावर बिअरच्या बाटलीने जीवघेणा हल्ला केला. त्याला प्रतिहल्ला म्हणून मित्रानेही तरुणावर बिअरच्या बाटलीने हल्ला केला. याप्रकरणात परस्पर विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही घटना रविवारी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास चाकण येथे घडली.

पहिल्या प्रकरणात २४ वर्षीय तरुणाने चाकण दक्षिण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार २३ वर्षीय तरुणाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून तो सध्या रुग्णालयात दाखल आहे. फिर्यादी आणि आरोपी हे एकमेकांचे मित्र आहेत. घटनेच्या वेळी आरोपीने जास्त मद्य प्राशान केले होते. त्यामुळे फिर्यादीने त्याला तू मोटार चालवू नको असे सांगितले. याचा राग आल्याने आरोपीने तू मला सांगणारा कोण, तुला जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली आणि मोटारीमधील बिअरची बाटली काढून फिर्यादीच्या डोक्यात मारून त्यांना गंभीर दुखापत केली.

याच्या परस्पर विरोधात जखमनी तरुणाने फिर्याद दिली आहे. त्यानुसार नागेश बळीराम चिम याला पोलिसांनी अटक केली आहे. तिघे मित्र एकत्र मद्यप्राशन केल्यानंतर जखमी तरुण आपली मोटार घेऊन जात असताना आरोपीने त्यांना हटकले. तुला मस्ती आली आहे का, तुला जिवंत सोडत नाही असे म्हणून आरोपीने हातातील बिअरची बाटली फिर्यादीच्या डोक्यात मारण्याचा प्रयत्न केला. फिर्यादीने डोके बाजूला केल्याने बाटली त्यांच्या उजव्या हाताच्या मनगटावर लागली. यामध्ये फिर्यादीच्या हाताची शिर तुटल्याने त्यांना गंभीर अवस्थेत खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. चाकण दक्षिण पोलीस तपास करत आहेत.

## लोणी देवकर येथे केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या जवानाचा मृत्यू

**पळसदेव, ता. ९ :** पुणे-सोलापूर महामार्गावर रस्ता ओलांडत असताना अज्ञात वाहनाने दिलेल्या जोरदार धडकेत मराडेवाडी (ता. इंदापूर) येथील केंद्रीय राखीव पोलिस दलातील जवानाचा जागीच मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना लोणी देवकर (ता. इंदापूर) ग्रामपंचायत हद्दीतील तोंडेवस्तीजवळ रविवारी (ता. ०८) रात्री सुमारे अकराच्या सुमारास घडली. महादेव दादा नाझीरकर (वय -३४, रा. मराडेवाडी, ता. इंदापूर) असे अपघातात मृत्युमुखी पडलेल्या जवानाचे नाव आहे. ते केंद्रीय राखीव पोलिस दलात कार्यरत असून सध्या मुंबई येथे सेवेत होते. मिळालेल्या माहितीनुसार, सुटीसाठी महादेव नाझीरकर रविवारी आपल्या गावी मराडेवाडी येथे आले होते. पुणे-सोलापूर महामार्गावरील लोणी देवकर येथील तोंडेवस्तीजवळ त्यांचे वडील त्यांना घेण्यासाठी आले होते. यावेळी रस्ता ओलांडत असताना



अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. अपघाताच्या वेळी त्यांचे वडील रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला उभे होते.

धडक इतकी भीषण होती की महादेव नाझीरकर यांचा जागीच मृत्यू झाला. सोमवारी (ता. ०९) दुपारी शासकीय इतमामात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात वृद्ध आई-वडील, पत्नी व मुले असा परिवार आहे. दरम्यान, कुटुंबाचा आधारवड आणि देशाचा एक कर्तव्यदक्ष रक्षक गमावल्याने परिसरात शोककळा पसरली असून ग्रामस्थांकडून तीव्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. अपघातानंतर पसार झालेल्या अज्ञात वाहनाचा पोलिसांकडून शोध सुरू आहे.

## विशेष शाळांतील अतिरिक्त शिक्षकांचे वेतन रोखले; ‘शिक्षक भारती’चा आंदोलनाचा इशारा

**लोणी काळभोर ता. १० :** विशेष शाळांतील अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे नोव्हेंबर ते जानेवारी या महिन्यांचे वेतन सरकारचे लेखी आदेश नसताना दिव्यांग कल्याण मंत्रालयाच्या जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकाऱ्यांकडून थांबविण्यात आले. यामुळे अनेक शिक्षक आर्थिक अडचणीत सापडले आहेत. इतर जिल्ह्यांत अतिरिक्त शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित असून केवळ मुंबईतील शिक्षकांना वेतन दिले जात नसल्याने शिक्षक भारती संघटनेच्या विशेष शाळा युनिटचे राज्य सचिव अशोक अण्णा जाधव यांनी या विरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.



पट निर्धारणानुसार अतिरिक्त करण्याची प्रक्रिया सरकारकडून राबविण्यात येत असून त्यात विशेष शाळांमधील शिक्षक अनेक शिक्षक अतिरिक्त ठरले आहेत. शाळा संहितेनुसार अतिरिक्त शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन समायोजन होईपर्यंत मूळ शाळेतून सुरू ठेवण्याची तरतूद आहे. मात्र मुंबई व उपनगरामधील अशा अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन अचानक थांबविण्यात आले.

याबाबत सरकारकडून कोणतेही लेखी आदेश नसताना जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयाकडून हा निर्णय घेण्यात आला. मागील तीन महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने या शिक्षकांना घरखर्च, मुलांचे शिक्षण, कर्जाचे हप्ते आणि दैनंदिन जबाबदाऱ्या सांभाळताना मोठी कसरत करावी लागत आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षक भारतीने दिव्यांग कल्याण मंत्रालयाच्या आयुक्तांना पत्र पाठवून या परिस्थितीकडे लक्ष वेधले आहे.

## लोणी काळभोर येथे मजुरी करणाऱ्या तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**लोणी काळभोर, ता. १० :** मजुरी करणाऱ्या एका तरुणाने झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. ही घटना लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील टायग्रीश स्कूलसमोर घडली असून रविवारी (ता. ८) सकाळी सात वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून आत्महत्येचे नेमकेकारण अद्याप अस्पष्ट आहे.



अरविंद शिवाजी जाधव (वय ३०, रा. लोणी काळभोर, ता. हवेली) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी अरविंदचा भाऊ प्रविण शिवाजी जाधव (वय २८) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात खबर दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अरविंद जाधव हा अविवाहित असून तो एका खाजगी कंपनीत काम करत होता. काही दिवसांपूर्वी संबंधित कंपनीकडून त्याला कामातून ब्रेक देण्यात आला होता. त्यामुळे तो घरीच राहत मिळेल ते काम करून उदरनिर्वाह करत होता. रविवारी सकाळी तो टायग्रीश स्कूलसमोर एका झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला.

ही बाब लक्षात येताच स्थानिक नागरिकांनी त्याला खाली उतरवून तातडीने लोणी काळभोर येथील विश्वराज हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन पुण्यातील रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविला आहे.

दरम्यान, शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असून अरविंद जाधवने आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल का उचलले, याचा तपास लोणी काळभोर पोलीस करीत आहेत.

## पुण्यात गुटखा तस्करांविरुद्ध लक्ष्मीनगर पोलिसांचा ‘सर्जिकल स्ट्राईक’

**पुणे, ता. १० :** पुण्यात गुटखा बंदी असतानाही अवैध साठा आणि वाहतूक सुरू असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. आंबेडकर चौकाकडून संगमवाडीच्या दिशेने जाणाऱ्या एका पिकअप वाहनातून मोठ्या प्रमाणात गुटखा जप्त करत लक्ष्मीनगर पोलिसांनी दोन जणांना अटक केली. या कारवाईत वाहनासह सुमारे २० लाख ५३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.




दुर्देश मोहनलाल जाट (वय १९, रा. रामनगर, येरवडा) आणि त्याचा साथीदार जगदिश वाघराम जाट (वय २८, रा. ताडीवाला रोड) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार हे दोघे पिकअप वाहनातून मोठ्या प्रमाणात गुटखा वाहतूक करणार असल्याचे समजले होते. त्यानुसार पोलिसांनी येरवडा परिसरातील दर्गा चौक येथे सापळा रचून संशयित वाहन अडवले. वाहनाची तपासणी केली असता त्यात मोठ्या प्रमाणात गुटखा आढळून आला.

महाराष्ट्रात गुटखा आणि सुगंधित तंबाखूच्या विक्रीवर अनेक वर्षांपासून बंदी असली तरीही अवैध साठा आणि तस्करीचे प्रकार अधूनमधून उघड होत आहेत. अशा अवैध व्यापारामुळे तरुणांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढण्याची भीती व्यक्त केली जाते, तसेच सरकारला महसुलाचेही मोठे नुकसान होते. त्यामुळे अशा कारवायांमुळे अवैध पुरवठा साखळीवर काही प्रमाणात आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.


या प्रकरणात जप्त करण्यात आलेल्या गुटख्याचा साठा नेमका कुठून आणला आणि तो कोणत्या ठिकाणी पुरवठा करण्यासाठी नेला जात होता, याचा तपास सुरू असून या प्रकरणात आणखी काही जणांचा सहभाग असल्याची शक्यता पोलिसांकडून तपासली जात आहे.

# काँग्रेसचा लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यावर अविश्वास प्रस्ताव

**नवी दिल्ली, ता. १० :** लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यावर काँग्रेसने अविश्वास ठराव मांडला आहे. विरोधकांना सभागृहात बोलू दिले जात नाही, लोकशाहीचा आवाज दाबला जातो, असा आरोप करत काँग्रेसने नियम ९४ (क) अंतर्गत हा ठराव सादर केला आहे.

लोकसभेत विरोधी पक्षाच्या नेत्यांनी खास करून राहुल गांधी आणि प्रियंका गांधी आक्रमक भूमिका घेतली होती. सभागृहात विरोधकांना बोलण्यास वेळ न दिल्याचा आरोप करून त्यांनी अध्यक्षांविरोधात कडवट भूमिका घेतली. काँग्रेसने ठराव सादर करण्याची प्रक्रिया पूर्ण करत ११८ खासदारांच्या सह्यांनी तो पाठवला आहे.

या सह्या काँग्रेस, सपा, डावे पक्ष आणि राजदसह जवळजवळ सर्व विरोधी पक्षांच्या खासदारांनी दिल्या आहेत. मात्र तृणमूल काँग्रेस (टीएमसी) या प्रस्तावापासून दूर राहिली आहे. काँग्रेस खासदार सुरेश कोडिकुनिल, गौरव गोगोई आणि मोहम्मद जावेद यांनी लोकसभेच्या महासचिवांकडे ठरावाची सूचना सादर केली आणि ११८ खासदारांच्या सह्यांचे पत्र जमा केले.



विरोधकांच्या आरोपानुसार, लोकसभा अध्यक्षांनी विरोधकांचा आवाज दाबला आहे. सभागृहाच्या कामकाजात पक्षपाती दृष्टिकोन ठेवून सरकारला अनुकूल निर्णय घेतले जात आहेत. काँग्रेस खासदार प्रियंका गांधी वाड्रा म्हणाल्या की, अध्यक्षांनी स्वतःचा अनादर केला आहे. पंतप्रधानांवर कोणताही आक्षेप न घेता, अध्यक्षांवर सरकारने दबाव आणल्याचा आरोप केला जात आहे. त्यामुळे पंतप्रधानांनी सभागृहात येण्याबद्दल स्पष्टीकरण देणे आवश्यक झाले, असेही त्यांनी सांगितले.

लोकसभा अध्यक्षांना हटविण्यासाठी संविधानाच्या कलम ९४ नुसार अविश्वास प्रस्ताव सादर करावा लागतो. त्यासाठी किमान ५० खासदारांच्या सह्या आवश्यक असतात. प्रस्तावाचा पूर्ण मजकूर महासचिवांना लेखी स्वरूपात सादर करावा लागतो आणि त्यात अध्यक्षांविरोधातील आरोप स्पष्टपणे नमूद असणे आवश्यक आहे. युक्तिवाद, अनुमान किंवा बदनामीकारक विधाने असू नयेत. महासचिवांकडे प्रस्ताव सादर केल्यापासून १४ दिवसांच्या आत त्यावर निर्णय घेतला जातो.

दरम्यान, ओम बिर्ला यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव टिकण्याची शक्यता धुसर आहे. विरोधी पक्षांच्या एकूण खासदारांची संख्या २२० इतकी असली तरी एनडीएकडे स्पष्ट बहुमत आहे. त्यामुळे लोकसभा अध्यक्षांविरोधात अविश्वास प्रस्ताव पास होण्याची शक्यता कमीच आहे.